प्रकरण: ६

चंडीदासमध्ये सायगल आणि पहाडी सन्यालसह सुरांची मैफल जमवणाऱ्या उमाशशीने पुढे विवाह केला आणि नंतर चित्रपटांना राम राम ठोकला.

□ रजनीकुमार पंड्या

चंडीदासने घडवला इतिहास

प्रत्येकाचा एक ठराविक काळ असतो असं म्हणतात ते काही खोटं नाही. हा नियम एखाद्या व्यक्तीला लागू होतो तसा संस्थेलाही लागू होऊ शकतो. द न्यू थिएटर्सच्या स्थापनेपासूनच चित्रपट ही संकल्पना 'तमाशा'च्या प्रभावातून बाहेर येऊन तिचा संबंध साहित्य, कला आणि संस्कृतीशी जोडला जाऊ लागला. चित्रपट अधिकाधिक कलात्मक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होऊ लागला. लेखणीच्या सहाय्याने कागदावर उतरवलेली साहित्यकृती जेव्हा कॅमेऱ्यात बंदिस्त होऊन पडद्यावर सजीव होऊ लागली, तेव्हा लोकांना या दोन्ही माध्यमातला फरक प्रकर्षाने जाणवला. पडद्यावरची कलाकृती वेळ, शक्ती आणि पैसा या तीनही दृष्टीने अधिक सशक्त ठरली. पण ते कोणा एकाच्या आवाक्यातलं काम नव्हतं.

बी. एन. सरकार यांच्या ही गोष्ट लक्षात आली होती. आणि म्हणूनच सगळ्या गोष्टींचा व्यवस्थित विचार करून द न्यू थिएटर्सची स्थापना केली. सुरुवातीला त्यांचे चित्रपट बॉक्स ऑफीसवर फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत. हे खरंय, पण त्यांना कर्जाच्या खाईत लोटलं असंही झालं नाही.

त्याकाळी द न्यू थिएटर्सनी रविंद्रनाथ टागोर आणि शरद बाबूंच्या कथांवर आधारित सिनेमे बनवून प्रणयाचे विविध रंग पडद्यावर गहिरे केले. त्याकाळात हे काम तसं कठीणच होतं. अनेक उच्चभ्रू लोकांनी आधी भुवया उंचावून नापसंती दर्शवली. पण मागाहून त्यांनाही या माध्यमाच्या चांगल्या बाजू स्वीकाराव्याच लागल्या. आणि जनमानसाचा हा दृष्टीकोन बदलण्यात द न्यू थिएटर्सचं योगदान मोलाचं आहे. अर्थात, साहित्यकृतींबरोबरच त्यांनी पौराणिक आणि संतांच्या जीवनावर आधारित चित्रपटांचीही निर्मिती केली. कारण पौराणिक अथवा संतांच्या जीवनावरील हे चित्रपट अपयशी ठरण्याची शक्यता त्या काळात फारच कमी होती. मुख्य म्हणजे, या विषयांवरचे चित्रपट कलात्मक आणि सात्विक असत. त्यात जादूटोणा, अंधश्रद्धा, दंभ यांचा किंचितही लवलेश नसायचा. मनुष्यजीवनाची नेमकी छबी त्यात प्रतिबिंबित होत असे. आणि त्यामुळेच हे चित्रपट उच्चभ्रू समाजाचा या क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलायला कारणीभूत भरले.

या शृंखलेत द न्यू थिएटर्सने *चंडीदास*(१९३२) *कपाल कुंडला, मीराबाई, सीता* हे बंगाली(१९३३) तर हिंदीत *राजराणी मीरा* आणि *पूरणभक्त*(१९३३)ची निर्मिती केली.



चंडीदासमध्ये उमाशशीसह सायगल

१९३४मध्ये संतकथांच्या परंपरेतलाच *चंडीदास* हा सिनेमा तर अनेक विक्रम स्थापन करणारा ठरला. आजच्या पत्रकारांच्या भाषेत बोलायचं तर, इंडस्ट्रीतला सगळ्यात पहिला सुपरडुपर हिट म्हणून हिंदी *चंडीदास*चंच नाव सांगता येईल. नीतिन बोस यांनी त्याची फोटोग्राफी आणि दिग्दर्शन अशी दुहेरी जबाबदारी सांभाळली होती. १९३३ मध्ये द न्यू थिएटर्सबद्दल काहीतरी गैरसमज झाल्याने नाराज देवकीबाबू द न्यू थिएटर्स सोडून कोलकात्याच्या मादन कंपनीत *सीता*च्या निर्मितीदरम्यान जोडले गेले आणि त्यामुळे *चंडीदास*च्या दिग्दर्शनाची आयतीच संधी नीतिनदास यांच्याकडे चालून आली. या चित्रपटाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, शीर्षकभूमिका साकारायची संधी सायगलांना या सिनेमात पहिल्यांदाच मिळाली. यापूर्वी त्यांनी *यहुदी की लडकी* आणि *दुलारी बीबीत* काम केलं होतं. त्यांचं नावही टायटल्समध्ये सर्वप्रथम होतं. तरीही त्या शीर्षक भूमिका नव्हत्याच.

*चंडीदास*ची कथा दमदार होती. गोपीनाथ नावाचा एक जुल्मी जमीनदार राणी नावाच्या नर्तकीचं अपहरण करतो. ही राणी चंडीदास नावाच्या संतप्रवृत्तीच्या पुजाऱ्याच्या प्रेमात वेडी झालेली असते. बंगाली *चंडीदास* १९३२मध्ये पडद्यावर आला आणि सलग अडुसष्ट आठवडे पडद्यावर राहण्याचा विक्रम त्याने केला. त्याचं दिग्दर्शन देवकी बोस यांनी केलं होतं. हिंदी *चंडीदास*चं दिग्दर्शन करण्यासाठी ते द न्यू थिएटर्समध्ये राहिले नाहीत. त्यामुळे हिंदी सिनेमालाही बंगालीइतका प्रतिसाद मिळेल का? याबाबत सरकार साशंक होते. पण हिंदी

आवृत्तीलाही तसाच प्रतिसाद मिळाला. याच सिनेमाने सायगलांना गायक-अभिनेता म्हणून प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांच्या चेहऱ्याला निरागसपणा आणि सात्विकतेची दैवी देणगी होतीच.(अशी देणगी लाभलेला आणखी अभिनेता काही वर्षांनी भारत भूषणच्या रुपात इंडस्ट्रीला लाभला होता.) प्रापंचिक संघर्षाची दृश्यं त्यांनी डोळ्यांच्या हावभावातून प्रभावी केली होती. शिवाय यात त्यांना दोन सोलो, एक युगूलगीत आणि उमाशशी तसंच पहाडी सन्यालबरोबर एक गाणं गायची संधी मिळाली होती. त्यांच्या दोन सोलो गीतांपैकी 'तरपत बीते दिन रैन...' हे गाणं त्यांची शास्त्रीय रागदारीवर असलेली पकड सिद्ध करणारं ठरलं. भारतीय हिंदी चित्रपट संगीताच्या इतिहासात असं अप्रतिम गीत पुन्हा झालंच नाही. दुसरं 'देखत वाको ही रूप प्रेमपुजारी...' सुमार चालीमुळे फारसं लक्षात राहिलं नाही. पण 'प्रेमनगर में बनाऊंगी घर मैं...' हे गाणं घराघरातून ऐकू येऊ लागलं. या गाण्याची सुरुवात उमा शशीच्या आवाजाने होते. मधुर झणत्कार करणाऱ्या वाद्यांची साथ आणि शेवटाच्या सुरुवातीला सायगलांच्या सप्तकातल्या टीपेच्या सुरातली 'एन्ट्री' यामुळे हे गाणं एक वेगळाच परिणाम साध्य करून जातं. या गाण्याचे गीतकार आगा हश्र काश्मिरी हेही समर्थ कवी होते. पण या गाण्याच्या बाबतीत बोलायचं झालं तर, त्यांच्या शब्दांपेक्षा सायगलांचा सूर अधिक प्रभावी आहे. आज सात दशकं उलटून गेल्यानंतरही त्या गीताचा प्रभाव ओसरलेला नाही, हे विशेष.



पहाडी सन्याल

द न्यू थिएटर्सने १९३२ मध्ये बंगालीत जो *चंडीदास* बनवला होता, त्यातले कोणतेही पोशाख, प्रॉपर्टी हिंदी *चंडीदास*मध्ये रिपिट करण्यात आली नव्हती. इतकंच नाही तर, दोन्ही सिनेमात आर. सी. बोरालांचं संगीत असूनही गाण्यांच्या बंदिशीत फरक होता. बंगाली *चंडीदास*पासूनच चित्रपटांत पार्श्वसंगीताची सुरुवात झाली. पात्रांचं स्वगत किंवा एखाद्या विशिष्ट दृश्यासाठी पार्श्वसंगीत देण्याचा प्रयोग या सिनेमात पहिल्यांदा करण्यात आला. चित्रपट निर्मितीकडे एक व्यवसाय म्हणून न पाहता एक मिशन, नवनवे प्रयोग करण्याची प्रयोगशाळा या नजरेने पाहिलं जाऊ लागलं.

या चित्रपटाची नायिका उमाशशी हिच्याविषयी फारच थोडी माहिती सापडते. १९४१मध्ये उच्चभ्रू बंगाली कुटूंबात जन्मलेल्या या अभिनेत्रीने द न्यू थिएटर्सच्याच *पूरणभक्त*पासून चित्रपटक्षेत्रात पदार्पण केलं. पण त्या सिनेमाच्या टायटल्समध्ये तिचं नाव सगळ्यात शेवटी होतं. याचा अर्थ त्यात तिचा रोल छोटा होता. पण त्या लहानशा भूमिकेतही तिने दाखवलेली चमक पाहून प्रभावित झालेल्या नीतिन बोस या दिग्दर्शकाच्या शिफारशीने तिला *चंडीदास*मध्ये नायिकेची भूमिका मिळाली. आणि तिनेही या व्यक्तिरेखेला पूरेपूर न्याय दिला. तिची गाणीही लोकप्रिय झाली होती. पण १९३८च्या *धरतीमाता*पर्यंतच ती या क्षेत्रात राहिली. 'दुनिया रंगरंगीली' गाण्यात के.सी.डे आणि सायगल यांच्याबरोबर तिनेही आवाज दिला. युगूल गीतांत उमाशशीचा आवाज अधिक खुलत असे 'आज सखी आई...' *माया*(१९३६) आणि 'जाग सजनिया जाग...' *धरतीमाता* ही तिची गाणी हिट ठरली. तिच्या आवाजावर लुब्ध झालेल्या बंगालच्या गुरुसहाय देव या प्रसिद्ध सॉलीसिटरशी तिने १९३८मध्ये लग्न केलं. आठ-नऊ मुलांची आई झाल्यामुळे तिला चित्रपटात पुनरागमन करण्याची संधीच मिळाली नाही. पण संगीत क्षेत्रातलं तिचं योगदान विसरूनही चालणार नाही.

याच सिनेमात पहाडी सन्यालची भूमिकाही अभूतपूर्व होती आणि लोकं त्यांनाही विसरू शकलेले नाहीत. १९५६मध्ये राज कपूरच्या *जागते रहो*मध्ये एका छोट्याशा भूमिकेत ते दिसले. शिवाय *ममता*(१९६६) आणि *आराधना*(१९६९)मध्येही ते लहान भूमिकांत चमकले. *यहुदी की लडकी* सिनेमातून त्यांनी द न्यू थिएटर्समध्ये प्रवेश केला. पण त्यात त्यांची भूमिका अगदीच नगण्य होती. मुळात त्यांना एक गायक म्हणूनच स्वतःची ओळख निर्माण करायची होती. असं असूनही या सिनेमात त्यांचं एकही गाणं नव्हतं.

पुढे *विद्यापती*(१९३७)मध्ये महत्त्वपूर्ण आणि गायकीची पूरेपूर संधी असलेल्या भूमिकेतून चमकलेल्या पहाडी सन्याल यांना आपल्या गायकीची प्रतिभा दाखवण्याची पहिली संधी *चंडीदास*मध्येच मिळाली. त्यात त्यांनी उमाशशीबरोबर एक 'मरूंगी मरूंगी सखी, निश्चय मरूंगी...' आणि उमा शशी-सायगलबरोबर 'प्रेम की हो जय जय...' ही गाणी गायली. शिवाय 'छाई बसंत, आई बसंत...' आणि 'तोरे प्रकाश से नाश हो सकल अहंकार...' ही दोन सोलो गीतं पहाडी सन्यालच्या आवाजात होती. त्याचं खरं नाव नगेंद्रनाथ सन्याल असं होतं. पण पहाडी प्रदेशात जन्म झाला म्हणून पुढे ते पहाडी सन्याल नावानेच ओळखले जाऊ लागले. १९०६मध्ये २२ फेब्रुवारी रोजी दार्जिलिंग येथे त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच संगीताकडे ओढा होता. त्याकाळातले प्रसिद्ध संगीतशिक्षक अशोक सेन यांच्याकडे त्यांनी संगीताची तालीम घेतली. त्यानंतर लंडनच्या मोरीस स्कूल ऑफ म्युझिक, आताचं भातखंडे विद्यालयमधूनही संगीताचं रितसर प्रशिक्षण घेतलं. पण आयोध्येच्या महाराजांचे खासगी सचिव म्हणून नोकरीला लागले. त्याच दरम्यान देवकी बोस अयोध्येला आले होते. दोघांचा परिचय झाला आणि पहाडी सन्याल द न्यू थिएटर्समध्ये दाखल झाले. या लोकप्रिय गायक अभिनेत्याचं १९७४च्या १० फेब्रुवारी रोजी निधन झालं. 'इस जीवन की फूलवारी...', 'प्रीत की रीत...', 'यह कूच के वक्त...'(*कारवाने हयात*), 'निराश मुसाफीर...'(*अधिकार*), 'गाये जा गाये जा...'(*माया*), 'पवन मस्त पवन...'(*हार जीत*) ही त्यांची गाणी आजही लोकांच्या स्मरणात आहेत. त्यांचे चिरंजीव लुकू सन्याल अनेक वर्षं मुंबई दूरदर्शनवर न्यूज रीडर म्हणून काम करत होते.

क्रमशः